www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २८७ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२६ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# लाडकी बहीण, भाऊ एकत्र असते तर दोन्ही पक्ष टिकले असते

## मनसेच्या मेळाव्यात राज ठाकरेंची फटकेबाजी; पक्ष सोडून जाणाऱ्यांनाही रेड कार्पेट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लाडकी बहीण, भाऊ एकत्र असते तर दोन्ही पक्ष टिकले असते असे म्हणत माणसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जोरदार फटकेबाजी केली आहे. तसेच पक्ष सोडून जाणाऱ्यांनाही रेड कार्पेट दिले आहे. मुंबईमध्ये मनसेचा पदाधिकारी मेळावा पार पडला. यामध्ये ते बोलत होते. याच मेळाव्यात राज ठाकरे यांनी स्वबळावर विधानसभा निवडणूक लढवण्याची मोठी घोषणा देखील केली आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत आता मनसेही मैदानात उतरल्याने निवडणुकीचा फड रंगणार आहे.

यामध्ये बोलतांना राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लाडकी बहीण योजनेवरून टोला लगावला आहे. ते म्हणाले, ''राज्यातील मूळ प्रश्नांकडे लक्ष द्यायला सरकारकडे वेळ नाही. मात्र राज्यात सध्या लाडकी बहीण, लाडका भाऊवरून राजकारण सुरू आहे. मात्र हे लाडकी बहीण, भाऊ एकत्र असते तर दोन पक्ष आज टिकले असते. योजना काढत आहेत मात्र सरकारकडे त्यासाठी पैसे आहेत का? रस्त्यावरचे खड्डे बुजवण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत'', असे राज ठाकरे म्हणाले.तसेच यावेळी पक्ष सोडून जाणाऱ्यांना राज ठाकरे यांनी रेड कार्पेट दिला आहे. ते म्हणाले, ''आपल्या पक्षातील एखाद दोन पदाधिकारी कोणत्या तरी पक्षात जायच्या तयारीत आहेत, असं मी ऐकलंय. ज्यांना जायचं त्यांनी जा. मी स्वत:



लाल कारपेट घालतो, जा म्हणून. पण नंतर तिकडे जाऊन जो भविष्याचा सत्यानाश करून घ्याल. त्यांचं स्थिर नाही, तुम्हाला कुठे डोक्यावर घेणार? लोकसभेला काय झालं माहीत आहे ना? वर्षापर्यंत घुसले. आता कुठे कुठे घुसतील माहीत नाही'', असा टोला राज ठाकरेंनी लगावला.येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. ते म्हणाले, ''येणाऱ्या विधानसभेत मनसेच्या नेत्यांना काही करून सत्तेत बसवायचे आहे. ही गोष्ट घडणार म्हणजे घडणारच आहे. त्यासाठी आम्ही सर्व जण तयारीला लागलो आहोत. ऐन निवडणुकीच्या वेळी कोणाशी युती होईल असा कोणताही विचार मनात आणू नका. विधानसभेत मनसे २२५ ते २५० जागा लढवणार'', असे म्हणत राज ठाकरे यांनी स्वतंत्र लढण्याचे जाहीर केले आहे. तसेच १ ऑगस्ट पासून महाराष्ट्र दौरा सुरू करणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.कोण कुठे गेले, समजत नाही

राज ठाकरे यांनी राज्यातील सध्या राजकारणावर भाष्य केले आहे. ''सध्या एकमेकांना केवळ शिव्या दिल्या जातात. त्यानंतर लोकांचे लक्ष विचलित करून निवडणूक भरकटवली जाते. कोण कुठे गेलेलं आहे?, कोण कोणत्या पक्षांत आहे? काहीच समजत नाही'', असे राज ठाकरे म्हणाले.नुकतेच राज ठाकरे हे परदेश दौऱ्यावर जाऊन आले. याबाबत त्यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून परदेशात होतो. अनेक मराठी बांधव- भगिनी भेटले. एक रेस्तराँ चालवणारा मराठी मुलगा भेटला. त्याने मला त्याच्या रेस्तराँला येण्याचा आग्रह धरला. तो मला म्हणाला, तुमची भाषणे ऐकून प्रेरणा घेऊन मी परदेशात रेस्तराँ सुरू केले. त्यावर मी त्याला म्हणालो, मी व्यवसाय सुरू करायला सांगितले देश सोडायला नाही. मात्र अनेक मराठी मुलांनी परदेशात आपले स्वत:चे व्यवसाय सुरू केले आहेत. हे पाहून बरे वाटते'', असे राज ठाकरे म्हणाले.

## थोडक्यात

### पालकमंत्री आणि प्रशासनाने सतर्क राहून मदत करावी

**मुंबई**–राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असून राज्यात हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला असून शेतकऱ्यांना सरकारने भरीव मदत केली पाहिजे, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. त्याचबरोबर नागरिकांनी जीव धोक्यात घालून घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे.राज्यात काही दिवसांपासून पूर्व विदर्भ, पुणे, कोल्हापूर, रायगड या जिल्ह्यात अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. येत्या काही तासात पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हवामान खात्याचा हा अंदाज आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी आज माध्यम प्रतिनीधींशी संवाद साधला.

### नाशिक, संभाजी नगर, सोलापूर येथे कांदा महाबँक

**मुंबई**–कांद्याची नासाडी रोखतानाच त्याच्या साठवणुकीसाठी महाराष्ट्रात अणुऊर्जा आधारीत कांदा महाबँक प्रकल्प सुरू होत असून राज्यात नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर येथे तातडीने कांद्याची बँक सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.कांदा महाबँक प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी पणनमंत्री अब्दुल सत्तार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, मित्रा चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. परमाणु आयोगाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर दुरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

### धरणातून पाणी सोडण्यापूर्वी जनतेला अलर्ट करायला हवे होते

**नवी दिल्ली**–पुणे जिल्ह्यांत गुरुवारी सकाळपासूनच पावसामुळे हाहाकार सुरू आहे. आता हाच पुण्यातील पावसाचा मुद्दा थेट लोकसभेत पोहोचला आहे. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सभागृहात पावसाचा मुद्दा उपस्थित केला आहे. अधिवेशनात पावसाची माहिती देत त्यांनी केंद्राला मदतीचे आवाहन केले आहे. तसेच त्यांनी अधिवेशनापूर्वी पत्रकारांशी बोलतांना या विषयावर भाष्य केले आहे.सभागृहात सुप्रिया सुळे म्हणाल्या, ''बारामती लोकसभा मतदारसंघासह पुणे, सातारा, कोल्हापूर या भागात प्रचंड पाऊस, अतिवृष्टी झाली. काल रात्री प्रशासनाने धरणातून पाणी सोडले. पण सरकारने पाणी सोडण्याआधी नागरिकांना अलर्ट करायला हवे होते. ऑरेंज किंवा रेड अलर्ट आहे, हे सरकारला माहिती असताना त्याबाबत पुण्याच्या नागरिकांना का सांगितले नाही. पुणे शहर, पिंपरी चिंचवड, वारजे, सिंहगड रोड या भागांतील अनेक शाळा, कॉलेज घरं पाण्याखाली गेली आहेत. लोकं प्रचंड अडचणीत आहेत'', अशी व्यथा सुळे यांनी संसदेत मांडली आहे.

### पुण्यात का निर्माण झाली पूरस्थिती?

**पुणे**–राज्यातील अनेक भागांत सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. मात्र पुणे जिल्ह्यांत पावसामुळे हाहाकार माजला आहे. अनेक रहिवासी भागांत पाणी साचले आहे. जनजीवन पूर्णपणे विस्कलीत झाले आहे. लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सूरू आहे. तर शाळा, महाविद्यालयांसह सर्व कंपन्यांनीही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकरी महिला ठार

**एक दिवस आधी जवळच असलेल्या मिंडाळा येथेही शेतात काम करीत असलेल्या दोडकू शेंदरे (वय ७०वर्ष ) शेतकऱ्याला ठार केले. लागोपाठ दोन दिवसात दोन शेतकऱ्यांना वाघाने ठार केल्याने शेतकऱ्यांत व परिसरात भीतीचे वातावरण आहे.त्यामुळे रोवायला जाणाऱ्या स्त्री पुरुषांनी शेतीचे कामे करताना सावध राहून काम करण्याची गरज आहे**



**नागभीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोन्ड ग्रामपंचायती अंतर्गत येत असलेल्या नवानगर येथील शेतकरी महिला जनाबाई जनार्धन बागडे (वय ४७)हिला वाघाने ठार केल्याची घटना २४ जुलैला सायंकाळी घडली .

सदर महिला दिवसभर आपल्या शेतात काम करीत होती. घरी परतीच्या वेळेस दबा धरून बसलेल्या वाघाने तिच्यावर हल्ला करून दुरपर्यंत नेले.घरी परत आली नसल्यामुळे खुप वेळ वाट बघितल्यावर तिच्या पतीने काही नागरिकांना घेऊन शोधाशोध केली. जनाबाई शेतावरून घरी परत आली नाही अशी गावात सर्वत्र वार्ता पसरली.आधीच वाघाच्या दहशतीत असलेल्या नागरिकांनी वाघाने काहीतरी गडबड केली असावी असा असा अंदाज लावून तिची जंगलात शोधाशोध केली मात्र रात्री ११वाजेपर्यंत सापडली नसल्याने नागभीड पोलीस स्टेशनं चे पोलीस निरीक्षक विजय राठोड आपल्या ताफ्यांसाह, व वनविभागाचे कर्मचारी यांनी नागरिकांसह शोधाशोध केली. २५ जुलैला सकाळी पुन्हा तिचा शोध घेतल्यावर तिचे शव जंगलात मिळाले. उत्तरीय तपासणीनंतर स्थानिक स्मशान भूमीत तिच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. तिच्या मागे पती, एक मुलगा, एक मुलगी असा आप्त परिवार आहे.

# तहसील कार्यालयासमोर भर पावसात सरकार व प्रशासना विरोधात नारेबाजी

## वनविभाग, महावितरण, तहसील कार्यालय समोर भूषण फुसेंचा जनआक्रोश मोर्चा

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

पगार घेणारे नौकर असून मालकाची भूमिका पार पाडत जनसामान्याचे जीवन जगणे कठीण केले आहे. आदिवासी बुहुल, नैसर्गिक शेती, उद्योग विरहित गोंडपिपरी तालुक्यात शेतकरी, युवक, बेरोजगार यांची पिढवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. शेतकऱ्यांना सिंचनाची सोय, विज,वन्य प्राण्यांपासून शेतपिकांसह मानव जीवाला धोका अशात शासनाचे कर्मचाऱ्यांची वागणूक गुंडशाही पद्धतीची असून खुर्ची गरम करण्याची असल्याने आक्रोश मोर्चातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. शेकडोंच्या संख्येने उपस्थित जनसामान्य नागरिकांनी प्रशासनाला खडे बोल सुनावले असून जनसामान्याची लूट करणाऱ्यांना धडा शिकवू असा इशारा भूषण फुसे यांनी जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून प्रशासनाला दिला.

गोंडपिपरी तालुक्यातील विविध विभागांच्या कार्यालयांवर जुनआक्रोश मोर्चा धडकला.



अनेकांनी यात सहभाग घेतला धाबा येथील वनविभाग कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करीत वनविभागाचे लक्ष वेधले. वन्य प्राण्यांपासून शेतपिकांसह जीवाला धोका त्यामुळे वन्य प्राण्यांचा बंदोबस्त तथा शेत उपयोगी लाकडांसाठी वनविभागाचे सहकार्य अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. डुकरांपासून जीव गेलेल्यांना मदत व शेतकऱ्याला मारहाण करणाऱ्या वनरक्षकांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची मागणी पुन्हा आक्रोश मोर्चातून पुढे आली.

गोंडपिपरी येथील महावितरण विभागात वीज बिलांची होळी करीत जनसामान्य ग्राहकांना होणाऱ्या त्रासापासून त्वरित सुटका व्हावी अन्यथा कायदेशीर धडा शिकवू असा इशारा भूषण फुसे यांनी जन आक्रोश मोर्चात दिला. मीटर येण्या अगोदर शेतकऱ्यांच्या हातात हजारांचे बिल थोपवले जाते. घरकुलधारकांना २००० हून अधिक वीजबिल दरमहा भरावा लागतो. जनसमान्यांची पिळवणूक बंद करा अन्यथा राजीनामा द्या असा इशारा महावितरण कर्मचाऱ्यांना मोर्चातून देण्यात आला.

भर पावसात असंख्य शेतकरी, मजूर, बेरोजगार आपल्या हक्क , अधिकारासाठी जन आक्रोश मोर्चा सामील झाले. तहसील कार्यालयासमोर विविध मागण्यांना घेऊन भूषण भुसे यांनी प्रशासनाला जागे केले. महाराष्ट्र सरकारच्या फसव्या योजना जनसामान्यांना त्रासदायक असून येणाऱ्या निवडणुकीसाठी लॉलीपॉप असल्याचे सांगितले. दीड हजार महिना देणाऱ्या लाडकी बहीण योजनेत जनसामान्यांची लूट सुरू आहे. आरोग्य, शिक्षण, सिंचन यापासून गोंडपिपरी तालुका वंचित आहे. तालुक्यात बस सेवा नाही. विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय नाही. शेतकऱ्यांना सिंचनाची सोय नाही. अशा विविध मागण्यांना घेऊन कार्यालयासमोर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला व निवेदनाद्वारे तहसीलदार शुभम बहाकर यांना कळविण्यात आले.यावेळी अबकी बार गोंडपीपरी के आमदार अशी घोषणा करण्यात आली. या जन आक्रोश मोर्चाचे नेतृत्व भूषण फुसे यांनी केले यावेळी तुकेश वानोडे, दिपक पेंदोर,प्रदीप कुळमेथे, शंकर पाल, भगिरत वाकडे सह असंख्य शेतकरी, युवक, बेरोजगार उपस्थित होते.

## धावत्या शिवशाहीला आग; ४४ प्रवासी सुखरूप

**बाळापूर**–राज्य परिवहन महामंडळाच्या धावत्या शिवशाही बसला अचानक आग लागल्याची घटना खामगाव ते अकोला मार्गावर रिधोरा जवळ गुरुवारी दुपारी १ च्या सुमारास घडली. या घटनेत शिवशाही बस संपूर्ण जळून खाक झाली. सुदैवाने जिवितहानी झाली नाही.शेगाव येथून अकोलाकडे जाणाऱ्या शिवशाही बसच्या इंजिनमध्ये वायरिंग जळाल्याने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. गुरुवारी शेगाव बसस्थानकावरून अकोला आगाराची एमएच ०९ ईएम १७९२ ही शेगाव–अकोला विनाथांबा विना वाहक शिवशाही बस अकोला जाण्यासाठी प्रवाशी घेऊन रवाना झाली. बाळापूर मार्गे अकोलाच्या दिशेने निघालेल्या बसने रिधोरा गाव ओलांडताच अचानक पेट घेतला. रिधोरा परिसरातील अशोक लेलँड वर्कशॉप जवळ बसच्या इंजिनमधून धूर निघत असल्याची बाब चालक पुरुषोत्तम डोंगरे यांच्या लक्षात आली.चालकाने बस थांबवत प्रवाशांना बाहेर काढले. प्रवाशी बसच्या खाली उतरताच आगीने बसला कवेत घेतले.

# वरोरा शहरात स्वच्छतेचे वाजले बारा ..!

## ठाणेदार साहेब दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करा

**वरोरा । आशिष घुमे**

शहरातील आझाद प्रभागातील नागरिकांसाठी असलेल्या सार्वजनिक शौचालयाची अवस्था सध्या बारा वाजल्या सारखी झाली आहे.असा आरोप येथील महिलांनी केला आहे.अनेकदा तक्रार करूनही वरोरा नगर पालिकेचे अधिकारी जाणीवपूर्वक कर्तव्यात हयगय करून स्वच्छतेकडे दुर्लक्ष करून नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप करीत दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करा अशा आशयाची तक्रार वजा निवेदन २५ जुलै रोज गुरुवारचा परिसरातील महिलांनी पोलीस निरीक्षकांना दिले.

शहरातील आझाद वॉर्ड परिसरात वॉर्डातील महिला व पुरुषांसाठी शौचालय आहे. परंतु या शौचालयामध्ये मागील अंदाजे २ ते ३ वर्षांपासून नगर पालिकेने स्वच्छता, पाणी व इलेक्ट्रिकची सोया केली नाही .याबद्दल अनेकदा नगर पालिकेला स्वच्छतेची मागणी केली. परंतु नगर पालिकेने



जाणीवपूर्वक केल्याचा आरोप निवेदनातून महिलांनी केला आहे. या वर्षी पावसामुळे या घाणीने तीव्र रूप धारण केले असून या घाणीतून मोठमोठ्या अळ्या निघून रस्त्यावर चालतांना दिसत आहे.यामुळे आमच्यात व आमच्या मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आम्हाला आमच्या घरात राहणे कठीण झाले आहे .तसेच त्या शौचालयात पाण्याची व्यवस्था व इलेक्ट्रिक नसल्याने त्याचा वापर करणे कठीण झाले आहे.या सर्व प्रकाराने आम्ही सर्व महिला व वॉर्डवासी त्रस्त झालो असून या प्रकरणाची वरिष्ठ स्थरावरून चौकशी करून आम्हाला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवून आमच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कर्तव्यात हलगर्जी करणाऱ्या नगर पालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी वरोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकअजिंक्य तांबोडे यांना दिलेल्या निवेदनातून महिलांनी केली आहे. सदर निवेदनाच्या प्रति जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा यांना उचित कार्रवाहीस देण्यात आल्या आहेत . निवेदन देतांना शबनम सलीम शेख , उजवळ भरत नागपुरे , दीपावली गणेश पडोळे , सुमनबाई मानकर , सुरेख लक्ष्मण नागपुरे या महिला उपस्थित होत्या .

**तक्रार घेऊन महिला पोहचल्या पोलीस ठाण्यात**

# लेक माझी लाडकी अभियान एक पर्व



**बुलढाणा जिल्ह्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागाचा सहवास असलेला तालुका म्हणजे लोणार ,विदर्भ आणि मराठवाडा यांना जोडणारा तालुका म्हणून लोणार ची ओळख सर्वसामान्य आहे. याव्यतिरिक्त लोणार शहराची ओळख लोणार सरोवर म्हणून जगप्रसिद्ध आहे.जगातील तिसऱ्या क्रमांकाचे उल्कापातामुळे निर्माण झालेले सरोवर म्हणून ठसा उमटविणारी जगमान्य ओळख आहे. लोणार तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब मजूर शेतकरी आर्थिकदृष्ट्या मागास पालकांच्या मुलींसाठी उच्च शिक्षण घेणे फारच कठीण बाब होती, ग्रामीण भागातील पालकांची उच्च शिक्षणाबाबत असलेली मानसिकता फारशी चांगली नव्हती आणि उच्च शिक्षणासाठी मुलींना बाहेरगावी पाठविणे व उच्चशिक्षण देणे याबाबत पालक वर्ग फारसा उत्साही नव्हता. एकतर बिकट आर्थिक परिस्थिती आणि बाहेरगावी जायचं तर पालक वर्गाचा आर्थिक बोजा वाढविणारा होता म्हणून मुलींचा कल उच्च शिक्षणाकडे नव्हता, पण अमृत सेवाभावी संस्थेने सन २००० मध्ये लोणार तालुका येथे पहिले विज्ञान महाविद्यालय सुरू केले, यामुळे पालक वर्गाच्या मुलींसाठी असलेला उच्च शिक्षणाचा प्रश्न निकाली निघाला, बरेच पालक आता आपल्या मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी तयार झाली व उच्च शिक्षण घेण्यात मुलींच्या संख्येत वाढ होऊ लागली. तरक्कियों की दौड में उसी का जोर चल गया – बना के अपना रास्ता जो भीड से निकल गया याप्रमाणे लोणार सरोवर येथे अमृत सेवाभावी संस्था परभणी यांनी सन २००० मध्ये उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवत कै. कु. दुर्गा क बनमेरू यांच्या नावाने कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार येथे सुरू झाले. परिणामी या परिसरातील गोरगरीब जनतेच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय या लोणार तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये सुरू झाली.**

**भाग १**

सन २००० मध्ये लावलेल्या या शिक्षण रुपी रोपट्याचे रूपांतर आज मोठ्या वटवृक्षात झाले आहे. लोणार शहरात सर्वसामान्य कुटुंब म्हणून बनमेरू परिवार वावरत होते. कुठलाही राजकीय वारसा नसताना लोणार सारख्या ग्रामीण सहभाग असलेल्या भागाच्या गावात गोरगरिबांच्या पाल्यांसाठी उच्च शिक्षणाची दारे उघडण्यात आली. त्याचे कारण असे होते की बनमेरू परिवारातील एकमेव कन्यारत्न कु. दुर्गाताई यांचे अल्पवयात आकस्मिक दुःखद निधन झाले. बा कमलो की बेमिसालो की याद आती है– जाने वाले कभी नही आते , जाने वालों की बस याद आती है कु. दुर्गाताईच्या आठवणीत व बहिणीचे असलेल्या प्रेमापोटी या परिसरातील इतर पालक वर्गाच्या कन्यारत्नांची उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कु.दुर्गाताईंना प्रेरणास्थानी ठेवून या महाविद्यालयाची उच्च शिक्षणासाठी सुरुवात झाली. या कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालयात बी.एससी. या विविध विषयातील विज्ञानाचे शिक्षण तर दिल्या जाते ,जसे की बी.एससी, एम.एससी. (संगणकशास्त्र )व नंतर लोणार सरोवर सरोवराचे महत्त्व ओळखून युजीसी स्कीमच्या अंतर्गत बि.व्होक. मध्ये (हॉस्पिट्यालिटी अँड टुरिझम मॅनेजमेंट) साठी शंभर टक्के स्वयंरोजगार उपलब्ध करून देणारा कोर्सला मान्यता मिळून सलग विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण उच्च शिक्षणाची दारे उघडी केली, त्यामुळे शंभर टक्के स्वयंरोजगार लोणार तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी प्राप्त करून दिली. तसेच विविध विभागाद्वारे सर्टिफिकेट कोर्सेस सुद्धा चालविले जातात. हे महाविद्यालय फक्त विज्ञान व तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षणच देत नाहीतर , या सोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यात सुद्धा हे महाविद्यालय संपूर्ण तालुक्यात अग्रेसर आहे.



**प्रा.डॉ.प्रकाश बनमेरू**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून सातत्याने या महाविद्यालयात शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा सामाजिक उपक्रम म्हणजे लेक माझी लाडकी अभियान कै.कु. दुर्गाताई बनमेरू यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक २७ जुलै रोजी राबविण्यात येते. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ सन २००९ पासून लेक माझी लाडकी अभियान राबविणारे कै.कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय हे बुलढाणा जिल्ह्यातील प्रथम महाविद्यालय आहे. लेक माझी लाडकी अभियान राबविण्यामागची प्रामाणिक भूमिका म्हणजे लोणार तालुक्यातील ग्रामीण परिसरातील गोरगरीब मजूर , शेतकरी व आर्थिक दृष्ट्यामागास असलेल्या पालक वर्गाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांच्या मुली उच्च शिक्षण घेऊ शकत नव्हत्या, अशा पालकांचा आर्थिक बोजा कमी व्हावा त्यासाठी सामाजिक बांधिलकी जपली जावी म्हणून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम या अभियानांतर्गत परिसरातील सर्वसामान्य गोरगरीब महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी बुलढाणा येथील सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. सुचिता भोंडे व डॉ. संगीता लद्दड प्रमुख अतिथी म्हणून पाचारण करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील ४०० महिलांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधाची वाटप करण्यात आले होते. सन २०१० मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. प्रकाश बनमेरू यांनी पदभार स्वीकारला आणि या अभियान आयोजनाची दिशा बदलण्याचे कार्य सुरू झाले.

सूर्य चंद्र जरी आले हाती – पण निसटली नाही पायाखालची माती याप्रमाणे प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांनी सामाजिक बांधिलकीचे भान जपत सन २०१० पासून लेक माझी लाडकी विद्यार्थिनी दत्तक योजना अभियानाला सुरुवात केली. या उपक्रमांतर्गत लोणार तालुक्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक विद्यालयातील वर्ग बारावीच्या होतकरू विद्यार्थिनींची निवड करून त्या विद्यार्थिनींना मोफत शालेय साहित्य वाटप करण्याची प्रथा सुरू झाली. शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे व आवश्यक असलेले सर्व शैक्षणिक साहित्याचे वाटप या अभियानांतर्गत केले जाऊ लागले , एवढेच नाही तर गरीब विद्यार्थिनींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे या हेतूने निवड झालेल्या विद्यार्थिनींना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश फी न घेता पूर्ण शिक्षण मोफत दिल्या जाते . तसेच पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाते. हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. लेक माझी लाडकी अभियानांतर्गत दरवर्षी आतापर्यंत शेकडो विद्यार्थिनींना याचा लाभ झाला आहे. मागील पंधरा वर्षापासून हे अभियान सातत्याने राबविण्यात येत आहे, प्रत्येक वेळेस गोरगरीब गरजू व होतकरू सर्वसामान्य पालकांच्या विद्यार्थिनींना दत्तक घेऊन त्यांना मोफत शालेय साहित्य वाटप करून पूर्ण उच्च शिक्षण मोफत दिल्या जाते. सन २००९ पासून सुरू झालेले हे अभियान आज पर्यंत अविरत सुरू आहे लेक माझी लाडकी अभियानासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व सन्माननीय व्यक्तींना प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शनासाठी आमंत्रित केल्या जाते. महाराष्ट्रातील अशा प्रतिभावंत सन्माननीय अतिथींच्या वैचारिक मार्गदर्शनाचा लाभ देखील या विद्यार्थिनींना व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या निमित्ताने होत असतो. आतापर्यंत या अभियानामध्ये प्रमुख अतिथी म्हणून सौ.मीनल ताई आंबेकर (सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटी) यांना आमंत्रित करण्यात आले होते या अभियानांतर्गत परिसरातील ज्या पालकांना एकच कन्यारत्न आहे ,अशा अकरा दांपत्यांचा सत्कार करण्यात आला होता, याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अमृत सेवाभावी संस्था , परभणी च्या अध्यक्षा सौ. उषाताई गोले, सचिव डॉ.संतोष बनमेरू उपस्थित होते.

# सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी कुटुंबातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेच्या पात्रता निकषांमध्ये बदल करा-आ.जोरगेवार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत केली मागणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी कुटुंबातील महिलांचे जीवन अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेच्या पात्रता निकषांमध्ये बदल करून शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्ती वेतन २ लाख ५० हजार पेक्षा कमी असलेल्या महिलांना सदर योजनेत पात्र ठरविण्यात यावे, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेत केली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही महाराष्ट्रातील गरजू महिलांसाठी एक उत्तम आर्थिक आधार योजना आहे. परंतु, सध्याच्या पात्रता निकषांमुळे काही महिलांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. विशेषतः, ज्या महिलांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार येथे किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमधून सेवानिवृत्ती वेतन घेत आहेत, त्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येत नाही.

अनेक सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांचे निवृत्ती वेतन अत्यल्प असून त्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न अडीच लक्ष रुपये पेक्षा कमी आहे. अशा परिस्थितीत, अशा महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ अधिकाधिक गरजू महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी, पात्रता निकषांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. ज्या सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी कुटुंबातील सदस्यांचे वार्षिक सेवानिवृत्ती वेतन आणि वार्षिक उत्पन्न २,५०,००० रुपये पेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेसाठी पात्र करून घेण्यासाठी निकषांमध्ये आवश्यक बदल करण्यात यावेत, अशी मागणी यावेळी निवेदनाच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे. यावेळी सदर मागणी बाबत सकारात्मक चर्चा झाली असून यावर लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री यांनी दिले आहे.

# कारगिल युध्दात शहीद झालेल्यांना मानवंदना

कारगिल शहर जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून २०५ किमी अंतरावर भारत–पाक आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषेपासून जवळ आहे. हिमालयाच्या इतर भागाप्रमाणे, कारगिलंमध्येही थंड वातावरण असते. उन्हाळा हा सौम्य तर हिवाळा अतिशय दीर्घ व कडक असतो व बऱ्याचदा तापमान –४० डिग्री पर्यंतही उतरू शकते. हे माहित असतांना देखील भारतीय सैन्यांनी पिछेहाट घेतली नाही. एवढया कडाक्याच्या थंडीत ते युध्दाला सामोरे गेले. त्यांच्या पराक्रमाची दाद द्यावी लागेल. राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्ट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून ५००० मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे तर आग्नेयेकडील द्रास व नैर्ऋत्येकडील मश्को खोऱ्यातील, तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली. कारगिल, द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या ह्या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असल्याने, हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी आणि उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर, ते ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत–पाकिस्तानमध्ये, कारगिल युद्धाच्या आधीपर्यंत होता. मात्र १९९९ साली भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे, कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली.



**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

श्रीनगर ते लेह दरम्यान धावणारा राष्ट्रीय महामार्ग १ डी कारगिलमधून जातो. कारगिलला उर्वरित भारतासोबत जोडणारा हा एकमेव रस्ता आहे. कारगिल विमानतळ सध्या भारतीय हवाई दलाच्या ताब्यात असून येथे नागरी विमानसेवा चालू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. १९९९ साली पाकिस्तानी लष्कराने घुसखोरी करून कारगिल भागावर अतिक्रमण केले होते. ह्यामुळे झालेल्या कारगिल युद्धात भारतीय लष्कराने पाकिस्तानला येथून हुसकावून लावले व कारगिल पुन्हा भारताच्या नियंत्रणाखाली आणले. हे युद्ध एकूण ६० दिवस चालले. युद्धात ३०,००० भारतीय सैनिकांनी लढाई केली. ५५७ सैनिक मृत्युमुखी पडले, तर १३६३ जखमी झाले. कारगिल युद्धात भारताच्या बोफोर्ससहित ३०० तोफांचा वापर झाला. एकट्या टायगर हिलवर ताबा मिळविण्यासाठी ९००० तोफगोळ्यांचा मारा झाला. मीडियम रेंजच्या ज्या बोफोर्सच्या तोफांचे आयुष्य ४० वर्षे असल्याचे सांगितले जात होते, त्या तोफांपैकी १८ तोफा २५ दिवसात निकामी झाल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच एवढ्या प्रमाणात एकाचवेळी एवढे फायरिंग झाले. कॅप्टन बत्राने ७ जुलै १९९९ रोजी कारगिल जवळचे जे शिखर काबीज केले त्याला हल्ली बत्रा टॉप म्हणतात. हिवाळ्यात कारगिल आणि आसपासच्या प्रदेशातील चौक्यांतून आपआपले सैन्य मागे घेण्याचा उभयमान्य रिवाज होता, तो पाकिस्तानने मोडला. त्यामुळे पुन्हा कारगिलसारखे युद्ध होऊ नये म्हणून तेथे हल्ली हिवाळ्यातही भारतीय सैन्य तैनात असते. भूभागाच्या सतत निरीक्षणासाठी टेहळणी पथकांमध्ये दहा पटीने वाढ करण्यात आली.

१९९९ च्या उन्हाळ्यात, पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाणी कब्जा केल्याचे भारताच्या लक्षात आले व या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगिलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगिल व द्रास परिसरातील



अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले. हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत्कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने–आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे दाखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच, भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेक पटीने वाढ केली. तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली. परिणामी, काही महिन्यांतच म्हणजे ऑक्टोबर, १९९९ मध्ये पाकिस्तानात जनरल परवेझ मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांचे सरकार उलथून लष्करशाही लागू केली. कारगिल युद्ध भारताने जिंकले.

पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला. १९९८ मध्ये भारत पाकिस्तानने अणु चाचण्या केल्यानंतर दोन्ही देशातील संबंध चांगलेच ताणले गेले. परंतु वाजपेयी यांनी मैत्रीचा हात पुढे करून संबंध निवळण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी ते स्वतः लाहोरला जाऊन आले होते. १९९८–९९ च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले व कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १ च्या जवळ यायचे. असे केले की, महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल आणि नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रण रेषा मान्य करायला भाग पाडले की. लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगिल/काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांनी सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्यात जी क्ती वापरली तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला असा काही लेखकांचा सूर होता.कारगिल युद्ध स्मारक हे भारतीय सैन्यदलाने द्रास शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर टायगर हिलच्या दिशेने उभारलेले स्मारक आहे. हे तोलोलिंग टेकडीच्या पायथ्याशी आहे. हे स्मारक श्रीनगर–लेह 'राष्ट्रीय महामार्ग क्र. १ डी' वर आहे. स्मारकातील भिंतीवर कारगिल युद्धात शहीद झालेल्या सर्व सैनिकांची आणि सैन्याधिकाऱ्यांची नावे कोरली आहेत. दरवर्षी या स्मारकात २६ जुलै हा दिवस कारगिल हुतात्म्यांचा स्मरण दिवस म्हणून पाळला जातो. कारगिलला पर्यटन स्थळाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. जेथे पाकिस्तानने बॉम्ब फोडले होते तेथे आज एक कारगिल हाईट्स नावाचे हॉटेल आहे. हॉटेलात एक जुना बंकर ग्राहकांच्या विलोकनार्थ शाबूत ठेवला आहे. असे बंकर पाकिस्तानी सैन्याच्या घुसखोरीनंतर लडाखच्या प्रत्येक घरात बनले होते. लोकांनी मागणी केल्यावरून 'लडाख हिल डेव्हलपमेन्ट काऊन्सिल' अस्तित्वात आले. त्यामुळे आता कारगिलमध्ये ४० हून अधिक हॉटेले झाली आहेत. स्थानिक रहिवाशांच्या घरांतही राहण्याची सोय होते. कारगिलला २०१६ या वर्षात ४२ हजार, २०१७ मध्ये ६७ हजार तर २०१८ या एकाच वर्षात एक लाख सात हजार पर्यटकांनी भेट दिली.२६ जुलै २०१९ या दिवशी कारगिल युद्धाला वीस वर्षे झाली. त्याच्या एक दिवस आधी जम्मू न्ड कश्मिर रायफल्सच्या १३ व्या बटालियनची एक बाईक रॅली उत्तराखंडातील दर्रापासून सुमारे १८५० किलोमीटरचा प्रवास करून २१ दिवसांनी लडाखमधील द्रासला पोचली. शेफ संजीव कपूर यांनी सैनिकांसाठी खास तिरंगी खीर बनवली होती. सर्व सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी त्या दिवशी एकत्र भोजन केले. जवानांच्या हौतात्म्यावर भारतीय सेनेने ८.२४ मिनिटांची एक शॉर्ट फिल्म जारी केली. त्याअगोदर कारगिल ट्रिबूट गीत गायले गेले व वाजवण्यात आले. गीताचे बोल होते, 'वीर जवानों, तुम्हें न भूलेगा तुम्हारा हिंदुस्तान' आज २५ वर्ष कारगिल युध्दाला होत आहेत. त्यात हौतात्म्य पत्करलेल्या सैनिकांना मानाचा मुजरा !

# जय हिंद सैनिक संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र मर्दाने यांची नियुक्ती






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

समाजभान जपणारे, उच्चविद्याविभूषित ज्येष्ठ पत्रकार व समाज कार्यकर्ते राजेंद्र मर्दाने यांची नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारधारेने प्रेरित आणि संविधानाला समर्पित तसेच सैनिक, शिक्षक व शेतकरी यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या जय हिंद सैनिक संस्था (रजि.) च्या चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे येथील ऑफिसर्स करिअर अकॅडमीच्या सभागृहात संस्थेचे मुख्य राष्ट्रीय संरक्षक तथा परमाणु वैज्ञानिक डॉ. अरूण कुमार सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंजाबराव मुधाने, राष्ट्रीय उपाध्यक्ष कॅप्टन नाजुकराव मानकर, राष्ट्रीय महासचिव जनार्दन जंगले, राष्ट्रीय संयोजक डॉ. रवींद्र मर्दाने, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चेनसिंग जाधव, मुंबई जिल्हा महिला ब्रिगेड अध्यक्षा मधुबाला जंगले, ऑफिसर करियर अकॅडमीचे संस्थापक कॅप्टन प्रो. अमितकुमार दुबे, उद्योजक कमल तापडिया, सुमन रानी सक्सेना संस्थेचे पदाधिकारी संजय चक्रनारायण, राजेश राठोड, विवेक राठोड, दीपक बोंबले, तेजाराम देवाशी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित जय हिंद सैनिक संस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिन कार्यक्रमात संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चेनसिंग जाधव यांच्या हस्ते राजेंद्र मर्दाने यांना टाळ्यांच्या गजरात नियुक्ती पत्र देऊन गौरविण्यात आले राजेंद्र मर्दाने हे मागील जवळपास ३२ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून विविध दैनिक, साप्ताहिकांत त्यांनी विपूल लेखन केले आहे. राष्ट्रीय सामाजिक न्याय कृति मंचाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष , डॉ. आंबेडकर - वाल्मिकी वेल्फेअर सोसायटीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष , वरोरा - भद्रावती - चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष ,ओशनिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष, आनंदवन मित्र मंडळाचे सचिव, पत्रकार सुरक्षा समितीचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष, वरोडा तालुका प्रेस क्लबचे माजी सचिव, माजी नगरसेवक, विविध सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी, शासकीय समितीचे सदस्य म्हणून त्यांनी आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. याव्यतिरिक्त साहित्य, कला, क्रीडा, संगीत अशा वेगवेगळ्या क्षेत्रातही त्यांनी भरीव योगदान दिले आहे. विविध क्षेत्रातील नैपुण्य आणि राष्ट्रीय एकता, एकात्मता, अखंडता राखण्यासाठी असलेली तळमळ पारखून त्यांची चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीने राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच माजी सैनिक परिवाराकडून त्यांचे अभिनंदनकेलेजातआहे.

# देशी गोवंश पाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिवर्ष १० हजार प्रोत्साहनपर राशीं द्यावी-मंगेश पोटवार

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना पुढाकार घेण्याची विनंती

**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा हा शेतकऱ्याचा जिल्हा म्हणून ओळख असून शेतकऱ्याचे आणि गाय बैलाचे त्याच्या दैनंदिन जिवनात अतूट नाते आहे.पण काळाच्या ओघात निर्माण झालेल्या समस्यामुळे शेतकऱ्यांनी गोवंश विकण्याचा सपाटा सुरु केल्यामुळे गोवंश नष्ट होण्याच्या मार्गावर आहे या पार्श्वभूमिवर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार याची भेट घेत गोवश सांभाळणाऱ्या शेतकऱ्यांना दरवर्षी १० हजार प्रोत्साहनपर राशीं देण्याची मागणी करून सोबतच मुल तालुक्यात देशी गोवंश संवर्धन केंद्र सुरु करण्याची मागणी केली.



शेतकऱ्याच्या जिवनात पूर्वीच्या काळी गाय आणि बैल हे फार महत्वाचे समीकरण होते. कारण गाईपासून बैल आणि बैल शेतीच्या कामासाठी उपयोग पण बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी आधुनिक साधनाचा शेतीसाठी दिवसेदिवस मोटच्या प्रमाणात वापर सुरु केल्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनातून गाई बैलाचे महत्व दिवसेदिवस कमी होत गेले. त्यातच पाळीव प्राणी पाळणे काळाच्या ओघात बदलत्या परिस्थिमुळे कठीण झाले असून चाऱ्याच्या प्रश्नापासून अनेक प्रश्न निर्माण झाले. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी त्यांना विकून मोकळे होण्याचा मार्ग पतकरल्यामुळे कसाई लोकांचे फावले असून त्यांनी देशी गोवंशाला कत्तलखान्यात पाठविणे सुरु केले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात गोवश नष्ट होण्याच्या मार्गावर असून भविष्य काळाच्या दृष्टीने हे निसर्ग आणि मानव जातीसाठी धोकादायक आहे.

या सर्व कठीण परिस्थितीतही गोवश पाळणाऱ्या शेतकऱ्यांना एक मदत मिळावी आणि त्यांना पाहून इतरही शेतकऱ्यांनी गोवश सांभाळण्याची इच्छा निर्माण होण्यासाठी गोवश सांभाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिवर्ष १०हजार प्रोत्साहनपर राशीं देण्याची मागणी मंगेश पोटवार यांनी जिल्हाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली.यावेळी शहर अध्यक्ष आकाश येसनकर उपस्थित होते. देशी गोवंशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी मुल तालुक्यात देशी गोवश केंद्राची सरकारणे निर्मिती करण्याचीहीमागणीकेली.

# अखेर प्रशासनाने 'त्या' रस्त्या वरील धोकादायक झाड हटविले



**गडचिरोली । प्रतिनिधी**

सतत सुरू असलेल्या पावसामुळे विविध रस्त्यावर झुकलेल्या धोकादायक झाडांमुळे अपघाताची शक्यता बळावली आहे.असाच प्रकार मुलचेरा ते बोलेपल्ली मार्गावर एक झाड अगदी डोक्याला लागण्याइतके झुकले होते.या झुकलेल्या झाडामुळे रहदारीला अडचण निर्माण झाली होती अखेर प्रशासनाने त्वरित दखल घेऊन झाड हटविले.

मुलचेरा ते एटापल्ली रस्त्यावर गट्टा,देवदा,हेटळकसा,बोलेपल्ली,चंदनवेली,गेदा,पुलीगुडमसह आदी गावांचा समावेश आहे. शिवाय एटापल्ली तालुक्यातील नागरिकांचा देखील आज रस्त्याने ये जा सुरू असते. सतत सुरू असलेल्या पावसामुळे या रस्त्यावर काही ठिकाणी झाडं झुकली होती. त्यामुळे रहदारीला अडचण निर्माण झाली होती शिवाय अपघाताची शक्यता देखील बळावली होती.ही गोष्ट मुलचेरा चे तहसीलदार चेतन पाटील यांना लक्षात येताच त्यांनी महसूल आणि पेडीगुडम वनपरिक्षेत्राच्या कर्मचाऱ्यांना पाठवून ती धोकादायक झाड हटविले.

त्यामुळे मुलचेरा ते एटापल्ली रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. यावेळी तलाठी रितेश चिंदमवार,क्षेत्र सहाय्यक पी एम वडेट्टीवार यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते.

# सांगा ना साहेब, प्रवाशी निवारा होणार तरी कधी ?

## घोराड येथील बस स्थानकाची दुरवस्था

**सेलू । प्रतिनिधी**

वदर्भाची प्रति पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र घोराड येथील बस स्थानकाची दुरवस्था झाली असताना या कडे लोक प्रतिनिधी चे लक्ष नसावे ही शोकांतिका असल्याचे बोलल्या जात आहे

.सेलू हिंगणी नागपूर असा नव्याने झालेल्या हाय वे रस्त्यावर सहा हजार लोकसंख्येचे घोराड हे गाव आहे गत तीस वर्षा अगोदर बांधलेले बसस्थानकाची पुरती वाट लागली असल्याने या बस स्थानकावर असलेले टिन पत्रे पूर्णतः फुटले असून येथे प्रवाशांना साधे पावसाळ्याच्या दिवसात उभे राहता येत नाही त्या मुळे येथे हायवे झाला इतर गावांना बस स्थानक नव्याने बांधण्यात आले पण येथे प्रवाशी निवारा ही बांधण्यात आला नसल्याने नागरिकात नाराजीचा सूर उमटत आहे.



विकासकामात गाव पुढे असल्याचे बोलल्या जात असताना मुख्य प्रवेश द्वार वर असलेल्या बस स्थानक ची दुर्दशा पहिल्या नंतर गावाच्या विकासाची कल्पना केली जात आहे तरी येथे नव्याने प्रवाशी निवारा बांधण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे.येथे येणाऱ्या भाविकांची मोठी वर्दळ असते प्रवाशांना बस ची प्रतीक्षा रस्त्यावर उभे राहून करण्याची वेळ आली आहे.तरी घोराड येथील जीर्ण झालेले बस स्थानक पाडून नव्याने प्रवाशी निवारा बांधण्यात यावा

# आलापल्ली-मुलचेरा रस्त्यावर खड्यांचे साम्राज्य त्यात कचऱ्याची भर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

मागील एक वर्षांपासून आलापल्ली-मुलचेरा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचा साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांसह वाहनधारक हैराण झाले आहेत.या रस्त्यावर जीवघेणा प्रवास सुरु असल्याने नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त केला जात असताना नुकतेच आलेल्या पुरामुळे पुलावर साचलेला कचरा साफ करण्यासाठी कोणीच पुढाकार घेत नसल्याने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडल्याचे दिसून येत आहे.

मुलचेरा तालुक्यातील गोमणी पासून तर विवेकानंदपूर पर्यंत रस्त्यावर मोठमोठे खड्डे झाले आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे अक्षरशः दुर्लक्ष झाल्याने आता पावसाळ्यात त्या खड्ड्यांना तलावाचे स्वरूप आले आहे.या रस्त्यावर मुलचेरा तालुका मुख्यालयात शिक्षण घेण्यासाठी शेकडो विध्यार्थी दररोज ये-जा करतात. विविध कार्यालयात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांची संख्या देखील तितकीच आहे.एवढेच नव्हेतर कर्मचारी आणि अधिकारी देखील याच रस्त्याने ये-जा करतात.या सर्वांना याचा जबर फटका बसत आहे.



मागील एक वर्षांपासून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी होत असताना देखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष झाल्याने परिणामी खड्ड्यांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

रस्त्यावरील खड्डे चुकविण्याच्या नादात अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे.सदर रस्त्यावर दुचाकी चालविणे कठीण झाले असून एसटी बस आणि इतर खाजगी वाहनधारक कसा प्रवास करत असतील याचा विचार न केलेला बरा.गेली पाच दिवसांपासून या भागात मुसळधार पाऊस सुरू आहे.नुकतेच चार दिवसांपूर्वी आंबटपल्ली आणि खुद्दीरामपल्ली दरम्यान असलेल्या नाल्याला पूर आला होता.पूर ओसरला असला तरी पुराच्या पाण्याने पुलावर साचलेला गाळ आणि कचरा साफ करण्यात आला नाही.एकीकडे कचरा साचला तर दुसरीकडे खड्ड्यात पाणी साचला आहे.त्यामुळे या पुलावर देखील अपघाताची शक्यता बळावली आहे.मागील चार दिवसांपासून पुलावर कचरा पडून आहे मात्र,याकडे कोणाचेही लक्ष नाही.आलापल्ली ते आष्टी मार्गावर खड्ड्यांचा साम्राज्य निर्माण झाल्याने खाजगी वाहनधारक मागील दोन वर्षांपासून आलापल्ली ते मुलचेरा याच मार्गाचा अवलंब करत आहेत.सध्या आलापल्ली ते आष्टी रस्त्यावरील दीना नदीवरील पूल पाण्याखाली आल्याने हाच एक पर्यायी मार्ग वापरण्यात आला.अश्या परिस्थितीत या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे नागरिकांमधून रोष व्यक्त केला जात आहे.

# तलाव फुटल्याने शेतीचे नुकसान शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्या

## संतोषसिंह रावत यांचे नेतृत्वात शेतकऱ्यांच्या वतीने काँग्रेसचे निवेदन

**मूल । प्रतिनिधी**

अती पावसामुळे दांबगाव येथील मामा तलाव फुटल्याने तलावाच्या पाण्याने शेकडो हेक्टर शेतीचे पूर्ण नुकसान झाले.यावर्षीचे पीक हातून गेल्याने ३५ शेतकरी हवालदिल झाले आहेत. काहींनी तर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. इतकी मोठी नुकसान झाली. सर्वच शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. अशा बाधित झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी यासाठी ३५ बाधित शेतकऱ्यांच्या वतीने काँग्रेसचे नेते चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष,माजी जी.प. अध्यक्ष संतोशसिंह रावत यांचे नेतृत्वात उपविभागीय अधिकारी व तहसीलदार मुल यांना शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



या निवेदनात पूर्ण पीक गेल्याने जेवढी नुकसान झाली तेवढी भरपाई शासनाने द्यावी फुटलेल्या तलावाची पाळ बांधून द्यावी ,रेतीचा उपसा मशिनद्वारे काढून शेतीची सुधारणा करुन द्यावी , बाधित शेतकऱ्यांचे चालू वर्षाचे पीक कर्ज माफ करावे ,नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत त्वरित द्यावी अशा मागण्या करण्यात आल्या असून निवेदन देताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राकेश रत्नावार, जिल्हा काँग्रेसचे महासचिव घनश्याम येनुरकर,तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गुरु गुरनुले, आदर्श खरेदी विक्री सहकारी सोसायटीचे सभापती पुरुषोत्तम भुरसे,कृ.उ.बा.स. संचालक किशोर घडसे, वी का.सोसायटी अध्यक्ष संदीप करमवार, अखिल गांग्रेडिवार, हसन वाढई, बंडूभाऊ गुरनुले, ओबीसी सेल राज्य सरचिटणीस गुरुदास चौधरी, युवक अध्यक्ष पवन निलमवार, उपसभापती राजेंद्र कन्नमवार,विनोद कामडी, महिला ता. अध्यक्षा रुपाली संतोषवार , मा.न.से.लीना फुलझेले,सचिव शामला बेलसरे, सीमा भसारकर, फर्जणा शेख, युवक उपाध्यक्ष संदीप मोहबे, अतुल गोवर्धन,अभय चिटलोजवार, विष्णू सादमवार, रोशन भुरसे रुपेश नीकोडे, यांचे उपस्थितीत उपविभागीय अधिकारी विशाल मेश्राम व तहसीलदार मृदुला मोरे यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे निवेदन देण्यात आले.

### या ३५ शेतकऱ्यांचे झाले नुकसान

**सुनील किरमे,लहानुबाई किरमे,जनार्दन नैताम, चोखा कुकुडकर,दसराबाई कोठारे, दारोबाई भसारकर, रेश्मा भसारकर, रेश्मा नैताम,रत्नमाला थरकर,महादेव थेरकर,अंबादास गेडाम, नगुबाई चलाख,रोशनी बारसागडे,आनंदराव नैताम, मायाबाई नैताम,अमरनाथ गेडाम,सागर बारसगडे,कमल बारसागडे, नारायण दुधबले,उष्टुजी दुधबाळे,लक्ष्मण बारसागडे,गोपाळ नैताम,हिरामण बारसागदे,गिरिधर बुरांडे,कमल धोड्रे, केशव बुरांडे,सुधाकर रायपूरे,तुळशीदास अवताडे,वर्षा बारसागडे, नेताजी बुरांडे,लीलाबाई बुरांडे, वासुदेव कुक्कुडकर,देविदास वाळके,श्रीनिवास सातपुते यांचे नुकसान मोठ्या प्रमाणातझालीआहे.**

# गडचिरोलीची सोनाली ठरली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणाची पहिली लाभार्थी

## विभागात ८ हजार ८४७ उमेदवारांची नोंदणी;१० हजार रुपये प्रतिमहा मिळणार विद्यावेतन

**गडचिरोली । आनंद दहागावकर**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत राज्यातील पहिली नियुक्ती गडचिरोली जिल्ह्यातील सोनाली गेडाम या युवतीला मिळाली आहे. नागपूर विभागासाठी या योजने अंतर्गत २९ हजार ५०० उमेदवारांच्या नियुक्तीचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ८ हजार ८४७ उमेदवारांनी नोंदणी झाली असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा घेतला. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नागपूर विभागाने पुढाकार घेतला आहे. या योजने अंतर्गत खाजगी व शासकीय अशा ८० आस्थापनांची नोंदणी करण्यात आली असून विभागात नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्राधान्याने प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यात येणार असल्याची माहिती विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत गडचिरोली जिल्ह्याने प्रशिक्षण योजने अंतर्गत पहिली नियुक्ती केल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिनंदन केले असून इतर जिल्हाधिकाऱ्यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढाकार घेवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

धानोरा येथील सोनाली गेडाम बिएससी व एमएससीआयटी असून त्यांची जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी कार्यालयात डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात आली असून त्यांना प्रतिमहा ६ महिन्यांपर्यत १० हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे. नागपूर विभागातील ११ खाजगी तर ६९ शासकीय आस्थापनामध्ये नोंदणी झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी १ हजार ७५८ पदे अधिसूचित करण्यात आले असल्याची माहिती विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, आयुक्त कार्यालयातर्फे राबविण्यात येणार आहे. उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ या योजने अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणार असून या योजनेसाठी राज्य शासनाने ५ हजार ५०० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. या अंतर्गत १२ वी पास झालेल्या उमेदवाराला प्रतिमहा ६ हजार रुपये, आयटीआय अथवा पदवी असलेल्यांना ८ हजार रुपये तर पदवीधर व पदव्युत्तर शैक्षणिक आर्हता असलेल्या उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमहा विद्यावेतन देण्यात येणार आहे. यासाठी उमेदवारांची किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असणे आवश्यक आहे.

### नागपूर विभागात या जिल्ह्यातून इतक्या उमेदवारांनी केली नोंदणी

| जिल्हा | अर्जाची संख्या |
|---|---|
| नागपूर | ३६९२ |
| वर्धा | ८५५ |
| भंडारा | ९६६ |
| गोंदिया | १८६६ |
| चंद्रपूर | ११७४ |
| गडचिरोली | २९४ |

### योजनेचा जास्तीत-जास्त युवकांनी लाभ घ्यावा

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत उद्योजक व विद्यार्थ्याने rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देवून नोंदणी करता येईल. तसेच या वेबसाईटवर उद्योजकांना मागणी नोंदविण्याची सुविधा आहे. विभागात खाजगी ११ व ६९ शासकीय अशा ८० आस्थापनांनी १ हजार ७५८ पदांची मागणी नोंदविण्यात आली आहे. या योजनेचा जास्तीत-जास्त युवकांनी लाभ घ्यावा असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे.**

### देव तारी त्याला कोण मारी !

# नाल्याच्या पुरात वाहून जाणाऱ्या तिघांना वाचवण्यात गावकऱ्यांना यश



**गडचिरोली । आनंद दहागावकर**

नाल्याच्या पुलावरून पाणी वाहत असताना दुचाकी काढण्याचा प्रयत्न करताना गडचिरोलीहून नागपूरला जाणाऱ्या तिघांवर प्राण गमावण्याची वेळ आली होती. परंतु ही बाब स्थानिक नागरिक व आपत्ती व्यवस्थापन पथकाला कळताच त्यांनी तत्परता दाखवून संबंधित तीघांचे प्राण वाचवले. याबाबत जिल्हाधिकारी संजय दैने यांनी संबंधित नागरिकांचे विशेष कौतुक केले आहे.

दिनांक २५ जुलै ला मौजा चुरचुरा माल येथे चुरचुरा-नवरगाव रस्त्यावरील नालावरील पाणी वाहत असताना नागपूर येथील रहिवासी राहुल किशोर मेंढे वय ३२वर्ष, आशा किशोर मेंढे वय ६५ व त्याचा भाचा दत्तश्री शरद गोडे वय १२ वर्ष हे तिघे आपल्या दुचाकीने गडचिरोली वरून नागपूर ला जाताना नाल्यावरील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे अडकून काही अंतरावर वाहत गेले. त्याच वेळी त्यांनी गावातील जवळ असलेल्या लोकांना हाक दिल्याने चुरचुरा येथील तैराक अनिल वामन गेडाम व त्यांचे इतर सहकारी यांनी जीवाची पर्वा न करता त्या तिघांचे प्राण वाचविले. त्यानंतर जिल्हा पथके, तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती गडचिरोली ची चमू तहसीलदार हेमंत मोहरे, मंडळ अधिकारी रुपेश गोरेवार, तलाठी भुरसे यांनी त्यांना गावात आणून कृष्णा रेड्डी, निलेश तेलतुंबडे, सीएचओ, आशा स्वयंसेवक, आपदा मित्र, पोलिस पाटील, कोतवाल यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले व त्यांना गडचिरोली येथे सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आले.

### पाणी वाहत असताना पुलावरून वाहन टाकू नये-जिल्हाधिकारी

पुलावरून पाणी वाहत असताना कोणतेही वाहन टाकू नये अशा प्रकारच्या सूचना जिल्हा प्रशासनाकडून वारंवार देण्यात येत आहे. या सूचनांकडे दुर्लक्ष करून आपल्या जीव नाहक धोक्यात घालू नये व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केले आहे.

# २७ जुलै रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशान्वये तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश विकास एस.कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीच्यावतीने दिनांक २७ जुलै २०२४ रोजी शनिवारला राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली/अहेरी तसेच तालुका न्यायालय, अहेरी, आरमोरी, चामोर्शी, देसाईगंज, धानोरा, कुरखेडा, सिरोंचा येथे आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयातील तडजोडीस पात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी दावे असे प्रलंबित वाद तसेच वाद दाखलपुर्व प्रकरणे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने आपसी तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत. यासाठी पक्षकार, अधिवक्ता तसेच नागरिकांनी राष्ट्रीय लोक अदालतमध्ये मोठया प्रमाणात आपसी तडजोडीने प्रकरणे निकाली काढावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्य यांनी केले आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये न्यायालयातील प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्ट प्रकरणे, भु-संपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, बँकेशी संबंधीत प्रकरणे तसेच वाद दाखलपुर्व प्रकरणांमध्ये टेलीफोन, मोबाईल कंपनी संबंधीत वाद, महाराष्ट्र राज्य वीज वितरण प्रकरणे, पंतसंस्थेशी संबंधीत प्रकरणे, नगर परिषद व ग्रामपंचायत अंतर्गत कर आकारणीचे प्रकरणे तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच येथील प्रकरणे इत्यादी प्रकरणांचा समावेश असणार आहे. लोकन्यायालयात पारीत झालेल्या अवॉर्डची न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे अंमलबजावणी करता येते. लोकन्यायालयात तडजोड केल्याने लोकांचा वेळ, श्रम व पैसा यांची बचत होते. दोन्ही पक्षकारांमध्ये असलेले वैर संपुन गोडवा, चांगले संबंध निर्माण होतात. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई मार्फत संपुर्ण राज्यात २७ जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे नियोजन केले आहे. तरी सर्वांनी दिनांक २७ जुलै २०२४ रोजी होणा-या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली, आर.आर. पाटील यांनीकेलेआहे.

# युवकांनी पक्ष संघटनेच्या माध्यमातून गावचे प्रश्न सोडवावे - डॉ.वझे

### असंख्य युवकांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश



**वरोरा । प्रतिनिधी**

युवकांनी पक्ष संघटनेच्या माध्यमातून गावचे प्रश्न सोडवावे ,भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडियाच्या माध्यमातून युवकांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठ तथा भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडी जिल्हा संयोजक सागर वझे यांनी केले . ते भाजपा जनसंपर्क कार्यालय वरोरा येथील आयोजित पक्ष प्रवेश कार्यक्रमावेळी बोलत होते .

२५ जुलै रोजी भारतीय जनता पक्ष्याच्या विचारधारेला अनुसरून,भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत या संकल्पनेला आत्मसात करत वरोरा शहर तथा वरोरा तालुक्यातील निलजई, शेगाव, वडधा. येथील युवकांनी भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव करण देवतळे, सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठ तथा भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडी जिल्हा संयोजक सागर वझे यांच्या नेतृत्वात व भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते बाबासाहेब भागडे यांच्या मार्गदर्शनात. भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालय सुयोग हॉस्पिटल वरोरा येथे पक्ष प्रवेश घेण्यात आला. या वेळी आदित्य जुनघरे, राहुल पाचभाई, समीर शेख , आकाश वराडे, रोहित भीमटे, गौरव देवतळे, आकाश देवतळे, सार्थक उमरे, महेश पाचभाई, अक्षय मडावी, मनोज उमरे, पवन घानमोडे, रोशन उमरे, संघरक्षित लिहितकर, सुमित खिरटकर यांच्यासह असंख्य युवकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला .या प्रसंगी,भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष संजय राम, अभय मडावी ,अमित चवले, विलास दारपूरकर, भारतीय जनता पक्षाचे युवा नेते खुशाल बावणे ,अभजीत गयनेवार इत्यादी पदाधिकारी व भाजप कार्यक्रते उपस्थित होते.

# त्या शिक्षकावर कारवाई करा, अन्यथा शाळेला कुलूप ठोकू

## शिवसेना (उबाठा)चे संवर्ग विकास अधिकाऱ्यांना निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील वडधा (तुकूम) येथे जिल्हापरिषदेची पहिले ते आठवी पर्यंत शाळा आहे .या शाळेत शैक्षणिक सत्र २०२४ - २५ करीत इयत्ता आठव्या वर्गात १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता . शिक्षक कमी असल्याने वर्ग घेता येणार नाही असे म्हणत विद्यार्थी व पालकांना सूचना देऊन १४ ही विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखल देऊन दुसऱ्या खाजगी शाळेत प्रवेश करायला लावल्याचा प्रकार घडला असून संबंधित मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षांचे जिल्हाप्रमुख तथा विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना पदाधिकारी व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ,वडधा (तुकूम) येथे शिक्षकांची संख्या रिक्त होती या रिक्त असणाऱ्या जागेवर १२ मार्च २०२४ ला सामाजिक शास्त्र विषयाच्या शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी काढले . ही रिक्त जागा भरली असतांना ही मुख्याध्यापक रमेश गोंगल यांनी २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेशित १४ विद्यार्थ्यांना हेतुपरस्पर शाळा व्यवस्थापन समितीला विश्वासात न घेता शिक्षक रुजू होऊ नये या हेतून विद्यार्थ्यांना व पालकांना शाळेत बोलावून आपल्या पाल्यांना दुसऱ्या शाळेत दाखल करा असा सल्ला दिला व १४ हि विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला देऊन आठवीचा वर्ग बंद केला.असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे .

शाळेत रुजू होणारे सतीश डांगरे यांना मुख्याध्यपक पदाचा प्रभार न देणे तसेच त्यांची प्रतिनियुक्ती दुसऱ्या शाळेत होईल या उद्देशाने सदर प्रकार मुख्याध्यापक गोंगल यांनी केल्याचा आरोप व्यवस्थापन समिती व शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे.

त्याच सोबत गोंगल हे सहा शिक्षक असतांना ही त्यांच्याकडे मुख्याध्यापक पदाचा प्रभार देण्यात आला . तेव्हा पासून मुख्याध्यापक गोंगल यांनी प्रशासकीय नियमाला डावलून कार्यास सुरुवात केली आहे. शासकीय नियमानुसार २६ जूनला २०२३ शाळाव्यवस्थापन समितीची सभा संत्रारंभी घेण्याचे असतांना सुद्धा ती सभा त्यांनी १५ जुलैला २०२३ ला घेतली . त्या सभेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीला आर्थिक व्यवहाराचा हिशोब सादर न करता सभा संपविण्यात आली. २६ जानेवारी २०२४ नंतर शालेय पोषण संदर्भात शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या मदतनीस नियुक्तीकरिता शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेतली त्यामध्ये सुद्धा कोणत्याही प्रकारचा जमाखर्च सादर न करता सभा संपविण्यात आली. यानंतर शैक्षणिक सत्र २०२४ -२५ ची शासकीय नियमानुसार १ जुलैला सभा न घेता शाळा व्यवस्थापण समितीच्या आग्रहास्तव १३ जुलैला सभा घेण्यात आली . त्या सभेमध्ये ही आर्थिक व्यवहाराबाबत मुख्याध्यापकांनी कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे यात आर्थिक घोटाळा झाला असावा असा आरोप करण्यात आला आहे .असे अनेक प्रकार शाळेत सुरु असून मुख्याध्यापकांनी पैसाची परस्पर उचलही केली आहे. एकंदरीत सदर मुख्याध्यपक जे शासकीय नियुक्तीच्या नियमावलीप्रमाणे पूर्णतः कार्यवाहीस पात्र असून शाळा व्यवस्थापन समितीच्या अर्जाचा विचार करून या प्रकारची चौकशी करून सदर शिक्षकाला दुसऱ्या शाळेत नियुक्त करावे व शाळेत नवीन दोन शिक्षकांची नियुक्ती करावी अन्यथा शाळा व्यवस्थापन समिती शाळेला कुलूप लावून शाळा बंद करेल असा इशारा ही निवेदनातून देण्यात आला. यावेळी निवेदन देताना युवासेना उपतालुका प्रमुख अक्षय झिले, विधानसभा विधानसभा संघटक सुधाकर मिलंमिले, बाजार समिती संचालक अभिजित पावडे, सरपंच ज्योती पोयाम, ग्रामपंचायत सदस्य मुकुंदा शेडकी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष जया मरस्कोल्हे, मंगेश बुऱ्हान, अरविंद मत्ते , सुनील शेंडे, सुरेश शेडकि, संजय नन्नावरे, विलास बोधे व आदी उपस्थित होते. सदर निवेदनाची दखल घेऊन त्या शिक्षकावर कारवाई करण्यात यावी अन्यथा शाळेला कुलूप ठोकून शाळा बंद करण्याचा इशारा युवासेना उप तालुकाप्रमुख अक्षय झीले यांनी दिला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .